# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/आयुक्त/११२/२०२१-२२
आयुक्त यांचे कार्यालय
दि. १९/१०/२०२१

**<u>तातडीचे</u>**

**<u>आदेश</u>**

**विषय**:- <u>कंत्राटी कर्मचारी नियुक्ती करीता चारित्र्य पडताळणी दाखला घेणेबाबत.</u>

महानगरपालिकेच्या स्थायी सेवेत रुजू करुन घेण्यापूर्वी अधिकारी/कर्मचारी यांचेकडून चारित्र्य पडताळणी दाखला घेण्यात येत असतो व तो सादर करणे त्यांचेवर बंधनकारक असते. त्याचप्रमाणे कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कमर्चारी पुरवठा करुन घेताना पुरवठा करण्यात आलेले कर्मचारी गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत किंवा कसे? याबाबतची खातरजमा करणे गरजेचे आहे. जेणेकरुन भविष्यात महापालिका कामकाजा दरम्यान अनुचित घटना टाळता येऊ शकतील.

करीता कंत्राटदारामार्फत पुरवठा करुन घेण्यांत येणारे कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी करुन घेणे कंत्राटदारास बंधनकारक करण्यांत यावे. तशी अट निविदेत समाविष्ट करण्यांत यावी. सध्यस्थितीत कार्यरत ठेका कर्मचाऱ्यांच्या चारित्र्याचे (गुन्हेगारी पार्श्वभूमी) हमीपत्र कंत्राटदाराकडून घेण्यात यावे. तसेच कर्मचाऱ्यांचे चारित्र्य तपासणी करुन तसा अहवाल सादर करावा.

सदर आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.

**(दिलीप ढोले)**
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
१) सर्व खाते प्रमुख/विभाग प्रमुख
२) स्थळ पत्र
३) सिस्टीम मॅनेजर (प्रत-संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी)